सरकारतर्फे साक्षीदार क्र.७ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - आशा पाटीलबा येळवंडे ,
वय - ३० वर्षे, व्यवसाय- शेती,
राहणार - सोनई शिवार, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

फिर्यादी यांना मी ओळखतो कारण, ते माझे शेजारी आहे. आरोपी क्र. १ व २ यांना मी ओळखतो कारण ते देखिल शेजारी आहेत. घटना कधी झाली, काय झाली व कुठे झाली हे मला सांगता येणार नाही कारण त्यावेळी मी कामाला गेले होते.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता मी माझ्या घराच्या समोर अंगण झाडत असताना मला भांडणाचा आवाज ऐकु आला त्यामुळे मी तिकडे गेले असता आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये मारहाण चालु असल्याचे मला दिसले. हे म्हणणे खरे नाही की, मी मारामारी कशावरून झाली असे विचारले असता फिर्यादी दादासाहेब याने मला सांगितले की, तो गुलाब खिलारी यांच्या सोबत बोलत असताना आरोपी क्र. २ तिथे आली व त्यांस म्हणाली की, ''आमच्या बटाईदाराला काय सांगतो?'' असे बोलुन तिने फिर्यादीला घाण-घाण शिवीगाळ करण्यास सुरूवात केली व त्यानंतर आरोपी क्र. १ तिथे आला व त्याने फिर्यादीला गजाने मारहाण करण्यास सुरूवात केली. हे म्हणणे खरे नाही की, दादासाहेब यांनी मला हेही सांगितले की, त्याची पत्नी स्वाती सोडवा-सोडव करण्यासाठी आली असता तिला आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व सदर झटापटीत स्वातीच्या गळ्यातील मंगळसुत्र गहाळ झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, पुढे दादासाहेब याने मला हेही सांगितले की, आरोपींनी त्यांस जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दादासाहेब व स्वाती हिने दवाखान्यात उपचार घेतले. हे मला माहित नाही की, दादासाहेबने तक्रार दाखल केली किंवा कसे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखाकिंत भाग-अ वाचुन दाखविण्यात आला. तो पोलिसांनी तसा का नोंदवला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी

खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास आरोपींतर्फे ॲड. पी.डी.गर्जे यांचे मार्फत नाकारला-</u>

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा

दिनांक-०९/०९/२०२५.